महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि-५/संकीर्ण/२०२३/ 5929 दिनांक : 28 DEC 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
(पुणे विभाग).

**विषय :- तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांची नियतकालिक तपासणी करणेबाबत.(पदवी/पदविका संस्था व तत्सम संस्था इ.)**

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईसी-३३९६/(७३/७६)/तांशि १, दि. १० एप्रिल, १९९७.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D4OEST1/15/2023-DESK4/201130/2023 दिनांक १२-१२-२०२३.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक यांना " प्रादेशिक विभागप्रमुख " म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ते संबंधित विभागाचे शैक्षणिक, प्रशासकीय व वित्तीय बाबींकरीता नियंत्रक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी काही संस्थांना वेळोवेळी भेट दिली असता संस्थांमध्ये काही प्रमाणामध्ये प्रशासकीय सुसूत्रतेचा अभाव दिसून आला आहे. तसेच वित्तीय अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत. विभागातील शासकीय संस्था यांचे नियतकालिक तपासणी होणे आवश्यक असल्याची बाब वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आलेली आहे.

सबब, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी शासकीय संस्थांतील शैक्षणिक, प्रशासकीय, व वित्तीय कामकाज हे विहित पध्दतीने होण्यासाठी या संस्थाना भेटी देऊन प्रत्यक्ष तपासणी अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देशित केलेले आहे. सदर निर्देशाच्या अनुषंगाने सोबतच्या तपासणी सूचीनूसार या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय संस्थांची तपासणी पुढील महिन्यात व तद्नंतर दर ६ महिन्यांनी नियमितपणे करण्यात येईल.

**त्याअनुषंगाने या विभागातील सर्व शासकीय संस्थांना सूचित करण्यात येते की, सोबत <u>जोडलेल्या तपासणी सूचीनूसार आवश्यक सर्व कागदपत्रे दिनांक ०४.०१.२०२४ पर्यंत तयार ठेवावीत व तपासणी समितीस उपलब्ध करावी</u> व तपासणी दरम्यान मा. सहसंचालकांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त केलेल्या समितीस सर्वतोपरी सहकार्य करावे.**

सोबत : संचालनालयाचे पत्र व तपासणी सूची.

**(मा.रा.जाधव)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

DTEM-D40EST1/15/2023-DESK 4

/201130/2023

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४७३/४२८.
ई-मेल–desk4@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४/आस्था/शा.सं.त./२०२३.

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर,
अमरावती व नागपूर

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
13 DEC 2023
आवक क्र. 10669

विषय : तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांची नियतकालिक तपासणी करणेबाबत. ( पदवी /पदविका संस्था व तत्सम संस्था इ.)

संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईसी-३३९६/(७३/७६)/तांशि १ , दि. १० एप्रिल, १९९७.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक यांना "प्रादेशिक विभागप्रमुख" म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ते संबंधित विभागाचे शैक्षणिक, प्रशासकीय व वित्तीय बाबींकरीता नियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी व निम्नस्वाक्षरीकारांनी काही संस्थाना वेळोवेळी प्रत्यक्ष भेट दिली असता संस्थांमध्ये काही प्रमाणामध्ये प्रशासकीय सुसूत्रतेचा अभाव दिसून आला आहे. तसेच वित्तीय अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत. विभागातील शासकीय संस्था यांचे नियतकालिक तपासणी होणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

सबब, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी शासकीय संस्थांतील शैक्षणिक, प्रशासकीय, व वित्तीय कामकाज हे विहित पध्दतीने होण्यासाठी या संस्थाना नियतकालिक भेटी देऊन प्रत्यक्ष तपासणी अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देशित केलेले आहे. सदर निर्देशाच्या अनुषंगाने सोबतच्या तपासणी सूचीनूसार आपल्या विभागातील सर्व शासकीय संस्थांचा तपासणी अहवाल संचालनालयास नियमितपणे सादर करावा, जेणेकरून तपासणी अहवाल शासनास सादर करता येईल.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देशास अनुसरून आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय पदवी / पदविका संस्थांचे डिसेंबर २०२३ व जानेवारी २०२४ या कालावधीचे तपासणी वेळापत्रक तयार करुन आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय संस्थांचा एकत्रित संस्थानिहाय तपासणी अहवाल दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत या संचालनालयास निश्चितपणे सादर करण्यात यावा. तसेच यापुढे नियमित तपासणी करुन तपासणी अहवाल दर ६ महिन्यांनी या संचालनालयास नियमितपणे सादर करावेत. सोबत तपासणी सूची जोडण्यात येत आहे.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
( डॉ. विनोद मोहितकर )
Date: 12-12-2023 18:46:46
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत, १) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर
२) प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था

# तपासणी सूची

सहसंचालकांनी संस्थेच्या पाहणी दरम्यान तपासवयाच्या बाबी

**१. शैक्षणिक विषयक बाबी**

- संस्थेतील प्रवेश प्रक्रियेबाबतची सद्यस्थिती.
- School Connect बाबतची कार्यवाही.
- NBA च्या अनुषंगाने संस्थास्तरावरील प्रगतीचा आढावा घेऊन मार्गदर्शन करणे.
- सर्व वर्ग खोल्या व प्रयोगशाळांची पाहणी करणे.
- शैक्षणिक वेळापत्रकानुसार कामकाजाची तपासणी
- चालु अभ्यासक्रमाच्या प्रगतीबाबत आढावा घेणे.
- संस्थेच्या निकालपत्रकाचे विभागनिहाय विश्लेषण.
- निकालपत्रकाच्या अनुषंगाने कमकुवत विद्यार्थ्यांना रेमिडियल क्लासेसची सुविधा पुरविणे.
- सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची एकत्रित बैठक घेऊन मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांशी संवाद साधुन त्यांचा अभिप्राय (Feedback) घेणे.
- परिसरातील उद्योगजगतासोबत करण्यात येणारे सामंजस्य करार.

**२. आस्थापना विषयक बाबी**

- संस्थेतील अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांचा हजेरीपट व बायोमॅट्रीक हजेरीची तपासणी करणे.
- सेवापुस्तकांची सद्यस्थिती व अद्यावत नोंदीबाबत खातरजमा करणे.
- सेवापुस्तकातील नोंदी (रजा लेखा, वेतनवाढीच्या नोंदी व इत्यादी) तपासणे.
- सेवानिवृत्ती प्रकरणाची तपासणी.
- संस्थेतील न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती.
- ई-ऑफिस अंमलबजावणीबाबत विभागीय कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती.
- संस्थेतील स्वच्छतागृह व संस्थेच्या परिसरातील स्वच्छता याबाबतचा आढावा घेणे.
- पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तपासणे.

**३. बांधकाम विषयक बाबी**

- संस्थेतील इमारतीच्या बांधकामाची सद्यस्थिती.
- संस्थेच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत पाहणी करुन संरक्षण भिंतीची सद्यस्थिती तपासणे.
- मुलांच्या वसतिगृहाची सद्यस्थिती , वसतिगृहाची स्वच्छता , पाणीपुरवठा व सोयीसुविधा इत्यादि.
- तंत्रशिक्षण संचालनाअंतर्गत येणा-या सर्व शासकीय वसतिगृहाची तपासणी करण्याबाबतच्या दि.२८.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.
- शासकीय संस्थेमधील नविन बांधकामाची सदस्थिती (राज्यशासन, केंद्रशासन व संस्थेच्या स्वनिधीमधून सुरु असलेली सर्व कामे).

## ४. लेखा विषयक बाबी

- रोख वह्या व जमा खर्चाचा ताळमेळ तपासणे.
- विभागातील शासकीय व अनुदानित संस्थातील प्रलंबित लेखाआक्षेप (लेखा परिक्षण व भांडार पडताळणी) याबाबतची संस्थास्तरावर केलेली कार्यवाही व सद्यस्थिती.
- संस्थेमध्ये जमा होणारा पैसा व खर्च बाब निहाय करण्यात येतो किंवा कसे याची तपासणी करणे.
- बाहयसहाय्यीत/केंद्रपुरस्कृत योजना/प्रकल्पाचे प्रस्ताव,मान्यता व त्यांची अंमलबजावणी बाबत तपासणी
- अंतर्गत महसूल निर्मिती व त्याचे वितरणाबाबत तपासणी करणे.
- निर्लेखन व लिलावाबाबतची कार्यवाही.
- जडवस्तुसंग्रह नोंदवह्या तपासणे.

## ५. संकिर्ण

- राष्ट्रीय सेवा योजना या योजनेअंतर्गत स्वयंनिर्वाहित व एकक सुरु करण्याकरीता मंजूर विद्यार्थ्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल .
- Community Development Scheme संदर्भातील कार्यवाही.
- वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन